# उपसंचालक आरोग्य सेवा

## राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे

लष्कर पाणी पुरवठा आवार, सेंट मेरी शाळेजवळ, पुलगेट, स्टॅव्हले मार्ग, पुणे ४११००१

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी - कार्यालय :- (०२० ) २६३३०५०९/२६३३०२२५

Email : statehealthlab@gmail.com aosphlpune@gmail.com


आरोग्य सेवा

जा.क्र.उसंआसे/रासाआप्र/भांडार/प्रि.टो.रिफिलिंग,दुरुस्ती से.सं.करार/ /२०२५ जा क्र 10178

दिनांक : 16/12/२०२५

प्रति,

................

................

................

**विषय :-** कार्यालयीन संगणक प्रिंटर सुविधा सुस्थितीत ठेवण्याकरिता **प्रिंटर टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती वार्षिक देखभाल व दुरुस्ती (Non- Comprehensive AMC) व नविन प्रिंटर टोनर** खरेदी करण्याकरिता **शासकिय संकेस्थळावर दरपत्रक मागविण्याबाबत** नोटीस प्रसिध्द करणेबाबत..

संदर्भ :- १) शा.निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र. ८२/भ.ाा/ उद्योग-४, दि.०१/१२/२०१६

२) शा.निर्णय वित्त विभाग दि.१७ एप्रिल २०१५

आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ चे शासन निर्णयान्वये खालील नमूद कार्यालयातील संगणक प्रिंटर सुविधा सुस्थितीत ठेवण्याकरिता **प्रिंटर टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती वार्षिक देखभाल व दुरुस्ती (AMC)** करण्याकरिता तसेच **आवश्यकतेनुसार नविन टोनर खरेदी** खालील नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीच्या आधिन राहुन दरपत्रके मागविण्यात येत आहे त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे कार्यालयातील संगणक प्रिंटर टोनर तपशिल**

| अ.क्र. | संगणक प्रिंटर टोनरचा तपशिल | नविन टोनर दर सर्व करांसहित रु.प्रति नग (Branded) (ISI Mark Tonar) | टोनर रिफिलींग दर सर्व करांसहित रु.प्रति नग | टोनर ड्रम दर सर्व करांसहित रु. प्रति नग | टोनर ब्लेड दर सर्व करांसहित रु.प्रति नग | टोनर पीसीआर दर सर्व करांसहित रु. प्रति नग | टोनर मॅगनेट रोलर दर रु. | टोनर डॉक्टर ब्लेड दर सर्व करांसहित रु.प्रति नग | टोनर चीप दर सर्व करांसहित रु. प्रति नग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | HP 88A Toner | —— | | | | | | | |
| २ | HP 79A Toner | —— | | | | | | | |
| ३ | HP 12A Toner | —— | | | | | | | |
| ४ | New Big Brother-Toner Toner No 2365, 2465 | —— | | | | | | | |
| ५ | Canon Toner 071 | | | | | | | | |
| ६ | EPSON, (754) Ink bottel 150ml | | | | | | | | |
| | प्रिंटर टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती वार्षिक देखभाल व दुरुस्ती (AMC) कालावधी / /२०२५ ते (१ वर्ष) / /२०२६ | | | | | | | | |

कृ.मा.प

**उपरोक्त संदर्भ क्र. १ शासन निर्णयातील प्रकरण क्र.३.२.३ मधील तरतुदीप्रमाणे व संदर्भ क्र. २ शासन निर्णयातील तरतुदीनुसार उपरोक्त तक्ता मध्ये नमूद कार्यालयीन** संगणक प्रिंटर सुविधा सुस्थितीत ठेवण्याकरिता **प्रिंटर टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती वार्षिक देखभाल व दुरुस्ती (Non- Comprehensive AMC)** करण्याकरिता तसेच कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार नविन टोनर खरेदी खालील नमूद अटी व शर्तींच्या आधिन राहून या क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांकडून दरपत्रक या कार्यालयास सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन आरोग्य विभाग संकेस्थळावर नोटीस (सूचना) प्रसिध्द करण्यात यावी. तसेच ही नोटीस (सूचना) संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामाचे ७ दिवसांचे आंत (दि.२६/१२/२५) रोजी पर्यंन्त सिलबंद स्वरुपात दरपत्रके या कार्यालयाकडे या कार्यालयास सादर करण्यात यावे.

(श्री. मनोहर द. धुम)
उपसंचालक आरोग्य सेवा,
राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे

# अटी व शर्ती

१) दरपत्रके पुरवठादाराच्या लेटर हेडवरच सादर करावे लेटर हेडवर आपल्या संस्थेचा शिक्का व सही असणे बंधनकारक राहिल.

२) ईमेल मार्गाने सादर केलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही.

३) संबधित पुरवठादाराकडून **विहित मुदतीमध्येच दरपत्रके देणे बंधनकारक राहील.**

४) दरपत्रके कार्यालयास सादर करताना दरपत्रके सिलबंद स्वरुपात व लिफाप-यावर मोबईल क्रमांक , ई मेल आयडी व पोस्टल पिन कोडसह पत्ता व्यवस्थित नमूद करुन थेट या कार्यालयाकडे विहित कालावधीत पुरवठादाराचे हस्ते कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत.

५) **उपरोक्त तक्ता मध्ये नमूद कार्यालयीन** संगणक प्रिंटर सुविधा सुस्थितीत ठेवण्याकरिता प्रिंटर टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती **वार्षिक देखभाल व दुरुस्ती (AMC)** करण्याकरिता तसेच कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार नविन टोनर खरेदी **आवश्यकतेनुसार साधनसामुग्रीचा पुरवठा इ. कामकाज करण्याकरिता दरपत्रक सादर करणारे संबधित पुरवठादार पुणे महानगरपालिका हद्दीतील बंधनकारक राहील, त्यानुसार पुवठादारांचे दरपत्रक ग्राहय धरण्यात येईल अन्यथा कार्यालयीन खरेदी समिती कडून रद्द करण्यात यईल याची नोंद घ्यावी.**

६) **उपरोक्त तक्ता मध्ये नमूद १ ते ६ बाबींसाठी कार्यालयीन** संगणक प्रिंटर सुविधा सुस्थितीत ठेवण्याकरिता प्रिंटर टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती **वार्षिक देखभाल व दुरुस्ती (AMC)** करण्याकरिता तसेच कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार नविन टोनर खरेदी **आवश्यकतेनुसार साधनसामुग्रीचा पुरवठा इ.** करिता **संबधित पुरवठादाराकडून दरपत्रकामध्ये नमूद करण्यात येणारे दर बाजारभाव नुसार असणे बंधनकारक आहे व पुरवठादाराकडून सादर करण्यात आलेले दरपत्रकातील दर हे स्थानिक बाजारपेठेतून बाजारभावमधील प्रत्यक्ष दरांच्या जवळपास असणे बंधनकारक राहील व याबाबत सदर कार्यालयाकडून पुरवठादाराने सादर केलेल्या दरांबाबत कार्यालयीन खरेदी समितीसमोर दरपत्रक उघडण्यापूर्वी कार्यालयाकडून स्थानिक बाजारपेठेमधील दरांसोबत खातरजमा करण्यात येईल त्यानंतरच संबधित पुरवठादाराचे दरपत्रकातील दर व दरपत्रक ग्राहय धरण्यात येईल व त्यामध्ये फार मोठी तफावत अथवा फरक कार्यालयीन खरेदी समितीस आढळून आल्यास सदर कंत्राट मिळविण्याच्या दृष्टीने दरपत्रकातील दर नमूद केले असल्याचे समजण्यात येईल, त्यामुळे केवळ कंत्राट मिळविण्याच्या दृष्टीने दरपत्रकातील दर सादर करण्यात येऊ नये तसे आढळून आल्यास पुरवठादाराचे दरपत्रक कोणतीही पूर्वसुचना न देता कार्यालयीन खरेदी समितीकडून तात्काळ रद्द करण्यातयेईल व दरपत्रकामध्ये अशा प्रकारचे दर नमूद करुन कार्यालयाचा वेळ व दिशाभूल करुन जाणीवपूर्वक केल्याचे गृहित धरुन, कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत (Black Listed /Debar) टाकण्याबाबत कार्यालयीन पत्राद्वारे आरोग्य विभाग संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कटाक्षाने दरपत्रक सादर करण्या-या पुरवठादाराने दखल घ्यावी याबाबतचे संपूर्ण अधिकार उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे यांस राहतील याची नोंद घ्यावी.**

७) उपरोक्त तक्तामधील टोनर रिफीलींग व टोनर दुरुस्ती करार हा १ वर्षासाठी करण्यात येत आहे. **संबधित पुरवठादारास कार्यालयीन पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर,सदरच्या काळामध्ये संबधित पुरवठादाराने उपरोक्त तक्ता मधील नमूद टोनर रिफीलींग व टोनर दुरुस्ती बाबत कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार करुन दयावे.**

८) दरपत्रकामध्ये उपरोक्त तक्ता मधील तपशिलामध्ये **नमूद साधनसामुग्रीचे एकुण ०५ बाबींपैकी ज्या पुरवठादाराचे दर सर्वात जास्त बाबींसाठी न्यूनतम दर नमूद केले असतील अशा एकाच पुरवठादारास याबाबत आदेश निर्गमित केले जातील.** या प्रकरणी कामांचे वेगवेगळे स्वतंत्र बाबनिहाय आदेश दिले जाणार नाहीत तसेच उपरोक्त तक्तामधील तपशिलामध्ये नमूद साधनसामुग्रीचे बाबनिहाय कामाची विभागणी करण्यात येणार नाही व याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कटाक्षाने दखल घ्यावी व याबाबतचे संपूर्ण अधिकार **उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे** यांना राहतील याची नोंद घ्यावी.

९) **उपरोक्त तक्तामधील अ.क्र. १ ते ०५मध्ये नमूद टोनर रिफलींगकरिता ब्रॅन्डेड कंपनीची पावडर वापरणे बंधनकारक आहे कोणत्याही लोकल कंपनीची पावडर वापरत असल्याचे कार्यालयाचे निदर्शनास आल्यास**

१०) **तसेच टोनर दुरुस्ती करिता उपरोक्त तक्त्यामधील टोनरचे पार्टस् Original Company make असणे बंधनकारक राहील.**

कृ.मा.प.

**११) उपरोक्त तक्तामधील अ.क्र. ०१ ते ०५ मध्ये नमूद नविन टोनर कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येईल, मात्र संबधित पुरवठादाराकडून कार्यालयास पुरविण्यात येणारा नविन टोनर Original Company make असणे बंधनकारक राहील व Duplicate असल्याचे आढळून आल्यास कोणतीही पूर्वसचुना न देता सदर वार्षिक करार तात्काळ रद्द करण्यात येईल याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कटाक्षाने दखल घ्यावी याबाबतचे संपूर्ण अधिकार उपसंचलक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे यांस राहतील याची नोंद घ्यावी.**

१२) उपरोक्त तक्तामधील टोनर रिफीलींग व टोनर दुरुस्ती देयक चलनासहीत वेळच्या वेळी कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

१३) उपरोक्त तक्तामधील टोनर रिफीलींग व टोनर दुरुस्ती देयके दरमहा महिना अखेरीस या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील सदर देयके विलंबाने सादर केल्यास कार्यालयाकडून स्विकारली जाणार नाहीत व सदर देयकांची अदायगी केली जाणार नाही. तसेच कार्यालयास विहित कालावधीत प्राप्त झालेली देयकांची अदायगी कार्यालयीन कोषागार कार्यालयातून पारित झाल्यानंतर शासकिय नियमानुसार करण्यात येईल.

१४) दरपत्रकांना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये काही त्रूटी आढळल्यास सदर नोटीस(सूचना) स्विकारणे व नाकारणे अथवा रद्द करणे इ. अधिकार **उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे** यांना राहतील.

१५) उपरोक्त तक्तामधील टोनर रिफीलींग व टोनर दुरुस्ती वार्षिक सेवा समाधानकारक किंवा आवश्यकतेनुसार न मिळाल्यास कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता सदरचा वार्षिक करार रद्द करण्यात येईल व याबाबत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रारची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी तसेच सदरचा वार्षिक करार रद्द करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार **उपसंचलक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे**यांना राहतील.

१६) संबधित न्युनतम (L-1) पुरवठादाराने सदर कार्यालयाचे पुरवठा आदेश प्राप्त होताच तीन दिवसांचे आंत उपरोक्त नमूद अ.क्र.१ ते १९ मध्ये नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे ५००/- चे बंधपत्र (Bond Paper)वर लिहून कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील

१७) दरपत्रके दि.२९/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्यावेळी संबधीत पुरवठादार / त्यांचे प्रतिनिधी कार्यालयात उपस्थित राहू शकतील.

१८) दरपत्रकासोबत मागील तीन वर्षाचे जीएसटी भरणा केल्याचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

१९) उपरोक्त तक्तामध्ये १ ते ०५ बाबी नमूद केल्यानुसार कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार **टोनर रिफीलींग व टोनर देखभाल दुरुस्ती** व त्याकरिता **आवश्यक पार्टस व ०१ ते ०६ मध्ये नमूद नविन टोनर खरेदी कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार खरेदी इ. वरील नमूद अ.क्र. १ ते १९ मध्ये नमूद सर्व अटी व शर्तीच्या आधिन राहून सन २०२५-२६ वर्षासाठी पुरवठा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधीकरिता दि.** / /२०२५ ते / /२०२६ पर्यंत ग्राहय राहील.

(श्री. मनोहर द. धुम)
उपसंचालक आरोग्य सेवा,
राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे

प्रत:- संकेत स्थळ / नोटीस बोर्ड